# भारुड: एक चिंतन

**डॉ. राम रौनेकर,**
प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक,
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड- ४३१२०४, जि. जालना.
मो. नं. ९४२०२२१४९८
ramraunekar@gmail.com.

लोकगीताचे भारुडाशी एकत्व मानून ल. रा. पांगारकर म्हणतात, 'बहुरूढ ते भारुड.' भारलेले गुढ व्यक्त झालेले आहे, ते 'भारुड' यावरून असे म्हणता येते- गारुड्या संबंधी जे आहे ते गारुड आणि भराड्यांसंबंधी जे आहे ते भारुड. या दोन्हीमध्ये काही साम्य आहे.

तळागाळातल्या लोकांना व्यावहारिक ज्ञानाबरोबर आध्यात्मिक ज्ञान देण्यासाठी, नीती शिकवण्यासाठी भारुडे लिहिली गेली आहे. पोर वृत्तीच्या लोकांना 'तर्क तो अर्क' असतो, याचे ज्ञान नसते, अशा लोकांना समजावण्यासाठी भारुडे लिहिली आहेत. वैराग्यवृत्ती नसलेले, प्रपंचात अडकलेले, अलौकिक बुद्धिमत्ता नसलेले, दिव्य प्रतिभाशक्ती नसलेले, अखंड जिज्ञासूवृत्ती नसलेले, समाजात अपेक्षित असलेले, गावातून हद्दपार झालेले, थकलेले, भागलेले अशा लोकांसाठी भारुडे लिहिली आहेत.

**भारुडातील अंतरंग:**

महालक्ष्मी ही आदिमाया असून ती दुष्टांचा संहार करणारी आहे. त्यासाठी तिने दहा अवतार धारण केले आहेत. प्रत्येक अवतारात तिने सज्जनाचे संरक्षण केले आहे. म्हणून गोंधळात तिला ज्ञान वैराग्याचा फुलवारा बांधतात, सूर्यचंद्राचे पोत पाजळतात, त्रिगुणांच्या वतीने आरती करतात, स्वतः पोतराज बनतात.

संसार आणि संसारिक याचे वर्णन भारुडात येते. "सत्वर पावगे मला | भवानी आई रोडगा वाहीन तुला |" ही स्त्री रोडगा वाहणारी आणि एकटा संसार करणारी आहे. या भारुडामध्ये नाथ महाराजांनी जे रूपके वापरली आहे, जी अशी-सासर= विषय, सोबती= दुश्चित, मी वा ती=भ्रांती, पती=अविवेक, सासरा=अहंकार, दीर=दंभ, नणंदा=ममता,रोडगा=आत्मस्वरूप, माहेर=पंढरी, माता=ब्रह्म.

**भारुडातील समाजदर्शन:**

नाथ महाराजांनी संपूर्ण सृष्टीकडे सर्वांभूती भगवदभाव या विश्वात्मक भावनेने पाहिले आहे. त्यामुळे समाजातील वाईट गोष्टी नष्ट होऊन चांगल्या गोष्टी उराव्यात या भावनेने त्यांनी भारुडाची रचना केली आहे.

नाथ महाराजांच्या काळात समाज धर्मांतर करू लागला होता. पर धर्मीय देवतांना पूजू लागला होता. यातून समाजाची आध्यात्मिक अधोगती होत होती. सामाजिक अवनती होत होती. हिंदू मुस्लिम यांच्यातील तेढ वाढत होती. धर्माधर्मात सलोखा कायम राहावा ही भूमिका नाथ महाराजांची होती. डॉ. हेमंत इनामदार आणि डॉ. वसंत जोशी म्हणतात, " नाथांचे कोणतेही काव्य केवळ तत्वचर्चेचा काथ्यकूट करणारे नसून त्यातील तत्त्व चर्चेला रंजक कथेची जोड त्यांनी दिलेली असते."[१]

संतांनी भारुडातून प्रभावी समाज संघटन केले आहे. समाज प्रबोधन करताना समाजातील सर्व घटकांना डोळ्यासमोर ठेवले आहे सर्व घटकांना भक्तीमंचावर एकत्र आणले आहे. जनसामान्यांना आध्यात्मिक सुख समाधान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला आहे. जनसामान्यातील न्यूनगंड घालविण्याचा प्रयत्न केला आहे. राजकीय धार्मिक परिस्थिती प्रतिकूल असताना समाजाला संघटित करण्याचे अवघड कार्य भारुडांच्या माध्यमातून संतांनी केले आहे. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, "संत स्वतः जगतात आणि जगाला उत्तम जीवनाचा मंत्र देतात."[२]

**भारुडातील प्रतिमा:**

अनुभवविश्व साकार होतांना समर्थ प्रतिमातून संतांनी आकाराला आणले आहे. रुची घालणाऱ्या भावभावनांचे स्वच्छ प्रतिबिंब भारुडातील अनुभवसृष्टीत जगामागील तत्त्वज्ञानाचे चिंतन एका पातळीवर;तर दुसऱ्या पातळीवर लौकिकांचे दर्शन घडविले आहे. 'स्व' जाणीव मावळता मनुष्य परमेश्वराशी एकरूप होऊ शकतो. हे संतांनी अनेक प्रतिमांच्या साह्याने सिद्ध केले आहे. "मायबाप माझे म्हणती मज माझ्या बाळा| शेवटी मोकालीती देती हाती काळा |"

भारुडातून विविध रसांचा आविष्कार होतो. त्यातही प्राधान्याने शांत, अद्भुत आणि हास्य रस हे येतात. प्रसादोक्त

रसांच्या साह्याने कलावंत वाचक अभिनयातून अंगिकाभिनय करतो. सूक्ष्म निरीक्षणातून कलावंत सुष्टदुष्ट भूमिका समर्थपणे साकारू शकतो. डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात, "संत साहित्य अक्षरात्वाला पोहोचले आहे.खेडोपाड्यापर्यंत ते जीभे-जीभे वरती खेळते आहे.त्यात समृद्ध आणि सर्वव्यापी संत वाङ्मयातून भारुडाचा जन्म झाला आणि संत साहित्याचे लोकवाङ्मयाचे गोजिरे रूप 'भारुड' प्रकारातून साकार झाले."[३] भारुडातून अत्यंत रेखीव अशी व्यक्ती वर्णने येतात. जसे- वासुदेवाच्या डोक्यावर मोरपिसांची लांब निमुळती टोपी असते. हातात टाळ असतात. विशिष्ट पद्धतीचा अंगारखा असतो. वासुदेवाबरोबरच जोगवा, भुत्या, जागल्या, आंधळे आदींवरही भाष्य करता येते.

**भारुडातील नायक:**

हे नायक जनसामान्यांचे प्रतिनिधी असतात. जसे वासुदेव, गोंधळी, वाघ्या, गारुडी, डोंबारी, जोशी, कैकाडी इत्यादी उपेक्षित व्यक्तींचे प्रतिनिधी असतात. जसे- महार, मांग, डौर, चोपदार, वेसकर, भुत्या इत्यादी. अपंगाचेही प्रतिनिधी असतात. जसे- आंधळे, पांगळे, लंगडे, थोटे, बहिरे, मुके, पिसे इत्यादी.

**भारुडातील नायिका:**

या नायिकांची स्त्रियांबद्दलची दृष्टी चौफेर व मर्मग्रही असते. या नायिकांनी तथाकथित सभ्यतेला गोंजारले नाही. स्त्रियांची रूपे निसर्गदत्त स्वरूपात मांडली आहेत. आजच्या नवनाट्यात समाज जीवनाची वास्तव चित्रे आताशा कुठे येऊ लागली आहेत. नाथ महाराजांनी त्याचा पायंडा फार पूर्वीच घातला आहे. याचाच अर्थ असा की, संतांनी सर्व स्तरातील स्त्रियांना न्याय बाजू दिली आहे. जसे- कुंटीन, शांखीन, जोगतीण, महारीण, मुरळी,सौरी, वैदीण इ. डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात, "या महाराष्ट्रात संतांनी अवतार घेतला आणि लोकशिक्षकाची भूमिका घेऊन लोकोद्धाराचे महान कार्य केले."[४]

भारुडामध्ये संतांनी सर्वसामान्यांच्याच असंख्य प्रतिमा वापरल्या आहेत. या प्रतिमांमध्ये सहजता, सुचकता, प्रत्ययकारिकता, प्रतीकात्मकता, प्रतिमांमधून रूपकात्मकता, नाट्यात्मकता, काव्यात्मकता, भावोत्कटता, देखणी शब्दकळा हे विशेष दिसतात. अत्यंत अर्थपूर्ण आणि विलोभनीय अशी ही प्रतिमासृष्टी आहे. डॉ. कुंता जगदाळे म्हणतात, " 'भारुड' हे मानवी मनाला मोहिनी घालणारे सुंदर सप्तरंगी इंद्रधनुष्य आहे."[५]

भारुडाची भाषा ही विषयानुरूप आलेली दिसते. विषयाच्या बाह्यांग व अंतरंगानुसार ही भाषा साकार झालेली आहे. जसे- डोंबाऱ्याची बोली, तेलगू- कानडी मिश्रित भाषेत लक्षणीय संस्था आहे. चमत्कृती, विरोधाभास, उपहास, उपरोध इत्यादीचा सहज वापर करण्यात आलेला आहे. सासुरवाशणीच्या अंतरीच्या व्यथा तिच्या शब्दात मांडलेल्या आहेत. व्यक्तीच्या संस्कृतीनुसार भाषेचा वापर झालेला आहे. म्हणून ती भाषा कधी धारदार असते; तर कधी ग्राम्यतेचा आश्रय घेते. पुनरुक्तीची, पाल्हाळाची मर्यादा कधीतरी ओलांडलेली दिसते. मोडक्या मोजक्या शब्दांचीच योजना केलेली दिसते. अल्पअक्षरत्व आणि अनुभूतीच्या रसायनात भिजलेली असल्याने हृदयाला जाऊन भिडते. म्हणून या भाषेत प्रत्येक प्रत्ययकारिकत्व आहे. संकेतात्मक प्रतीके संतांनी वापरली आहेत. प्रतीकांच्या मागे मानसिक प्रतिबिंब आहे. 'मोती' भारुडात येणारे 'चिन्मय मोती' चौसोफी वाड्यातून झोपडीकडे येणारी लोकभाषा भारुडात येते. ज्ञानदेव-नामदेवांच्या अभंगात, महदंबेच्या धवळ्यात, म्हाईमभट्टाच्या लीळेत लोक भाषेची गंगोत्री प्रगटली, ती नाथांच्या भारूडातून खळखळून वाहू लागली म्हणून ती सर्वांना लोकप्रिय झाली आहे.

संतांची प्रतिभा समृद्ध आणि प्रगल्भ असल्यामुळे पारंपारिक लोक रंगभूमीला त्यांनी आगळे वेगळे स्वरूप दिले आहे. त्याची भारुडे विविधरुपी आणि बहुरंगी-बहुढंगी स्वरूपाची आहेत. त्याचे प्रत्येक रूपक ठसठशीत, स्वतंत्र आणि आखीव रेखीव आहे.

**संदर्भ**

1. इनामदार, डॉ. हेमंत वि.-जोशी, वसंत स. : एकनाथ-कालीन मराठी साहित्य, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९०, पृ. क्रं. ४४.
2. फडकुले, निर्मलकुमार: संत तुकारामाचा जीवनविचार, सुविद्या प्रकाशन, सोलापूर. प्रथमावृत्ती १९९९, पृ. क्र. १४३.
3. देखणे, रामचंद्र : महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ७०.
4. देखणे, रामचंद्र : तुका म्हणे जागा हिता, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. क्र. ३४.
5. जगदाळे, कुंता : भारुड : एक चिकित्सा, प्रकाशक नारायण जगदाळे, बार्शी. प्रथमावृत्ती, १९९४, पृ. क्र. २३८.